# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत दि.२०/०९/२०१७ रोजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्थांचे प्रस्ताव स्विकारून त्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ तसेच दि.१५ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयानुसार (शासन निर्णय क्र. एनजीसी२०१७/(२९/१७)/मशि/४, दि.१५ सप्टेंबर, २०१७) इरादा पत्र देण्यासाठीची कार्यवाही करून विहित मुदतीत शासनाकडे सदरचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. तथापि, मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक- बृआमा-२०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि.३०/११/२०१७ चे पत्र, सदर पत्रासोबतचे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) दि.२१/११/२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता सन २०१७ चा दि.२८ नोव्हेंबर, २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८ नुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्थांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखडयामध्ये दोन बिंदूंचा समावेश झाल्याने सदरच्या सुधारित बृहत आराखडयानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत जाहिरात देण्यात येत आहे. **तथापि, दि.२०/०९/२०१७ रोजीच्या जाहिरातीनुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्थांसाठी ज्या संस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडे अर्ज सादर केले आहेत, अशा संस्थांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांनी यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील, याची नोंद घ्यावी.** याअनुषंगाने www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील B.C.U.D.→AffiliationT-2 'Information/Lists' या लिंकवर **विस्तृत जाहिरात**, दि.२८ नोव्हेंबर, २०१७ चा अध्यादेश क्र.२८, दि.३०/११/२०१७ चे शासन पत्र, माहितीपत्रक, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ चा शासन निर्णय, **शासनमान्य** पंचवार्षिक बृहत आराखडा व त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची नवीन बिंदूंचा समावेश केलेली वार्षिक योजना ठेवण्यात आली आहे. शै.व. २०१८-१९ च्या वार्षिक योजनेनुसार इच्छुक शैक्षणिक संस्थानी दि.१५/१२/२०१७ रोजी पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) विद्यापीठ कार्यालयीन वेळेत प्रस्ताव व शुल्क सादर करणे आवश्यक आहे.

**तसेच दि.१५ डिसेंबर, २०१७ पर्यंत फक्त नवीन महाविद्यालये/परिसंस्था याबाबतचे प्रस्तावच स्विकारले जातील. नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय इ. बाबतचे प्रस्ताव सादर करण्याची मुदत संपुष्टात आल्याने सदरचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी सादर करणे आवश्यक आहे. शुल्क बँकेत जमा करुन प्रस्ताव दि. १५/१२/२०१७ नंतर सादर करता येणार नाही. पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही.

क्र.शिवाजीवि/संलग्नता/टी-२/

दिनांक: ०६/१२/२०१७

डॉ.विलास.डी.नांदवडेकर

कुलसचिव

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत दि.२०/०९/२०१७ रोजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्थांचे प्रस्ताव स्विकारुन त्यावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ तसेच दि.१५ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयानुसार (शासन निर्णय क्र. एनजीसी२०१७/(२९/१७)/मशि/४, दि.१५ सप्टेंबर, २०१७) इरादा पत्र देण्यासाठीची कार्यवाही करुन विहित मुदतीत शासनाकडे सदरचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. तथापि, मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक- बृआमा-२०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि.३०/११/२०१७ चे पत्र, सदर पत्रासोबतचे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) दि.२१/११/२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता सन २०१७ चा दि.२८ नोव्हेंबर, २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८ नुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्थांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या बृहत आराखडयामध्ये दोन बिंदूंचा समावेश झाल्याने सदरच्या सुधारित बृहत आराखडयानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत जाहिरात देण्यात येत आहे. याअनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये (कोल्हापूर/सांगली व सातारा जिल्हे) बृहत आराखडयामधील तरतुदीनुसार नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरू करण्यासाठीच्या प्रस्तावांबाबत इच्छुक शिक्षण संस्थांना कळविण्यात येते की-

१) ज्या शैक्षणिक संस्था सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०९ नुसार नवीन महाविद्यालये /मान्यताप्राप्त संस्था सुरू करू इच्छितात अशा संस्थांनी इरादा पत्र प्राप्त होण्यासाठी आपले प्रस्ताव बृहत आराखडयामधील तरतुदीनुसार विद्यापीठ व शासनाच्या विहित नमुन्यामध्ये विहित शुल्कासह कार्यालयीन वेळेत १५ डिसेंबर,२०१७ रोजी पर्यंत विद्यापीठात सादर करावेत.

**२) तथापि, दि.२०/०९/२०१७ रोजीच्या जाहिरातीनुसार नवीन महाविद्यालये/परिसंस्थांसाठी ज्या संस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडे अर्ज सादर केले आहेत, अशा संस्थांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांनी यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील, याची नोंद घ्यावी.**

२) बृहत आराखडा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर B.C.U.D.→Affiliation T-2'Information/Lists' या लिंकवर उपलब्ध आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०९ (२) नुसार बृहत आराखडयामधील तरतुदीप्रमाणेच प्रस्ताव स्विकारले जातील.

३) दि.१५ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयानुसार (शासन निर्णय क्र. एनजीसी२०१७/(२९/१७)/मशि/४, दि.१५ सप्टेंबर, २०१७) नवीन महाविद्यालये (पारंपारिक/व्यावसायिक) सुरू करण्याच्या अनुषंगाने इरादा पत्र देण्यासंदर्भात शासनाने विहित केलेला अर्जाचा नमुना (परिशिष्ट 'अ') तसेच अर्जासोबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची सुची (परिशिष्ट 'ब') विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावरील लिंकवर उपलब्ध आहे. तसेच विद्यापीठाच्या विहित अर्जाच्या नमुन्यामध्येही आवश्यक त्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यानुसार सर्व बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्विकारले जातील. (शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर,२०१७ मध्ये नमुद परिशिष्ट 'ब' नुसारच सर्व कागदपत्रे त्या क्रमाने पाठपोट पृष्ठ क्रमांक लिहून सादर करावीत.)

४) विद्यापीठाच्या विहित अर्जामधील प्रस्ताव फक्त मुळ प्रतीमध्ये व दि.१५ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयातील अर्जाच्या विहित नमुन्यामधील प्रस्ताव; परिशिष्ट 'ब' मधील आवश्यक कागदपत्रांसह तीन प्रतींमध्ये सादर करावेत. सदरची कागदपत्रे परिशिष्ट 'ब' मध्ये नमुद केलेल्या अनुक्रमांकानुसारच प्रस्तावास जोडण्यात यावीत. तसेच सदरचे प्रस्ताव DVB-TTSurekh या फॉन्टमध्ये व PDF न करता दोन सीडीमध्ये सादर करावेत.

५) प्रस्तावाच्या मुखपत्राचा (Covering Letter) नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर बीसीयुडी लिंकवर उपलब्ध आहे. फक्त त्या नमुन्यातच प्रस्तावांचे मुखपत्र (Covering Letter) स्विकारले जाईल.

६) शिखर संस्थांशी संबंधीत प्रस्ताव बृहत आराखडयामधील तरतुदीनुसारच स्विकारले जातील.

७) बृहत आराखडयात तरतुद नसलेल्या ठिकाणांसाठीचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

८) शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी **हस्तेपोहोच** करणे आवश्यक आहे. शुल्क बँकेत जमा करुन प्रस्ताव दि.१५/१२/२०१७ नंतर सादर करता येणार नाही. तसेच सदरचे प्रस्ताव फक्त विद्यापीठ कार्यालयीन वेळेतच पोहोच होणे आवश्यक आहे. विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क स्विकारले जाणार नाही. **तसेच पोस्टामार्फत व अन्य सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**

**९) बृहत आराखडयामध्ये नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडया तसेच सॅटेलाईट सेंटर नमुद असली तरी सुधारित अध्यादेशानुसार फक्त नवीन महाविद्यालये/परिसंस्थांचे प्रस्तावच स्विकारले जातील. तसेच नवीन महाविद्यालये/प्रस्तावांसाठी दि.२०/०९/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार ज्या संस्थांनी प्रस्ताव सादर केले आहेत त्या पात्र व अपात्र सर्व संस्थांनी पुन्हा नव्याने प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही. सदर संस्थांचे यापूर्वीचे प्रस्ताव विचारात घेण्यात येतील.**

क्र.शिवाजी वि/संलग्नता/टी-२/
दिनांक: ०६/१२/२०१७

डॉ.व्ही.डी.नांदवडेकर,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षाच्या सम्यक योजनेस (बृहत आराखडा) अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची वार्षिक योजना

(मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या क्रमांक- बृआमा-२०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि.३०/११/२०१७ च्या पत्रास अनुसरुन सुधारित केलेली)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षाच्या सम्यक योजनेस (बृहत आराखडा) अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची वार्षिक योजना

## पुर्वपिठीका

१. वार्षिक योजना भाग - १ मध्ये जिल्हा व तालुका निहाय महाविद्यालयाचे प्रकार, विद्याशाखा यांच्या प्रस्तावीत ठिकाणांची माहिती, भाग - २ मध्ये विद्याशाखानिहाय नवीन विषय/अभ्यासक्रमांची माहिती व त्यांची प्रस्तावीत ठिकाणे यांची माहिती देण्यात आली आहे.

२. सदरची वार्षिक योजना ही महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दि.१३ सप्टेंबर, २०१७, शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७, दि.३०/१०/२०१०, दि.२५/१०/२०११ व दि.०२/०९/२०१३ मधील तरतुदी व माहेडने मान्यता दिलेल्या विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यामधील तरतूदींना अनुसरुन आहे.

३. विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नव्याने सुरू करावयाचे पारंपारीक विषय, तसेच अतिरिक्त तुकड्या व प्रवेश क्षमता वाढ यांची गरज सतत बदलत असल्याने या बाबींचा बृहत आराखड्यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. तथापि, नव्याने सुरु करावयाचे पारंपारीक विषय/अतिरिक्त तुकड्या/प्रवेश क्षमता वाढ याबाबतच्या प्रस्तावांकरीता वरील क्र.२ मधील शिफारशी व तरतुदी लागू राहतील व यासाठी प्रस्ताव दाखल करणा-या महाविद्यालयास नजिकच्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. पारंपारिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा समावेश बृहत आराखड्यामध्ये करण्यात आलेला नाही. अस्तित्वात असलेल्या संलग्नित महाविद्यालयामध्ये ज्या विषयासाठी पदवी अभ्यासक्रम सुरु आहे त्याच विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव सादर करता येतील. तथापि, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाबाबतच्या प्रस्तावांकरीता वरील क्र.२ मधील शिफारशी व तरतुदी लागू राहतील व यासाठी प्रस्ताव दाखल करणा-या महाविद्यालयास नजिकच्या महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षाच्या सम्यक योजनेस (बृहत आराखडा) अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची वार्षिक योजना

### भाग १ - जिल्हा व तालुकानिहाय महाविद्यालये, अभ्यासक्रम, विद्याशाखा आणि त्यांची प्रस्तावित ठिकाणे

#### कोल्हापूर जिल्हा

| अ.क्र. | शहर / तालुका | प्रस्तावांची स्थळ | महाविद्यालय/विद्याशाखा तपशिल |
|---|---|---|---|
| I | II | III | IV |
| १. | कोल्हापूर शहर | १. कोल्हापूर शहर | १. इन्स्टिटयुट ऑफ फॉरेन्सिक सायन्स |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | ३. इन्स्टिटयूट फॉर योगा एज्युकेशन |
| | | | ४. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे रात्र महाविद्यालय |
| | | २. साळोखेनगर | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| २. | करवीर | १. कोपार्डे | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी) |
| | | २. तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | २. हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्युट (पदविका व पदवी स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी) |
| ३. | पन्हाळा | १. पणोरे | विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी) |
| | | २. तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. वास्तूशास्त्र महाविद्यालय |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | ३. हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्युट (पदविका व पदवी स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी) |
| ४. | हातकणंगले | १. इचलकरंजी शहर | विधी महाविद्यालय |
| | | २. विक्रमनगर, इचलकरंजी | वाणिज्य महाविद्यालय |
| | | ३. तालुक्यामध्ये एक | कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ५. | शिरोळ | तालुक्यामध्ये एक | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| ६. | कागल | १. मौजे(सेनापती) कापशी | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | २. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ७. | गडहिंग्लज | १. गडहिंग्लज | १. विधी महाविद्यालय |
| | | | २. इंग्रजी माध्यमाचे वाणिज्य विद्याशाखेचे नविन महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| | | | २. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ८. | चंदगड | तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| | | | २. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ९. | आजरा | १. गवसे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | ३. हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्युट (पदविका व पदवी स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी) |
| १०. | भुदरगड | १. पाटगांव | वनविज्ञान अभ्यासक्रमांसाठी संस्था / महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |

| अ.क्र. | शहर / तालुका | प्रस्तावांची स्थळ | महाविद्यालय/विद्याशाखा तपशिल |
|---|---|---|---|
| I | II | III | IV |
| ११. | राधानगरी | १. कोनोली तर्फ असंडोली | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | ३. हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिटयुट (पदविका व पदवी स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी) |
| १२. | गगनबावडा | तालुक्यामध्ये एक | हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिटयुट (पदविका व पदवी स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी) |
| १३. | शाहुवाडी | तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| १४. | इन्स्टिटयुट फॉर शुगर ॲण्ड अलाईड प्रोडक्टस् टेक्नॉलॉजी | साखर कारखाना असलेल्या ठिकाणी तसेच अशा प्रकारच्या दोन महाविद्यालयांमध्ये किमान ४० कि.मी. चे अंतर असणे आवश्यक. | |

## सांगली जिल्हा

| अ.क्र. | शहर / तालुका | प्रस्तावांची स्थळे | महाविद्यालय/विद्याशाखा तपशिल |
|---|---|---|---|
| I | II | III | IV |
| १. | सांगली शहर | सांगली | १. वास्तूशास्त्र महाविद्यालय |
| | | | २. इन्स्टिटयुट ऑफ फॉरेन्सिक सायन्स |
| | | | ३. इन्स्टिटयूट फॉर योगा एज्युकेशन |
| | | | ४. उर्दु माध्यमाची विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका उर्दु महाविद्यालयासाठी) |
| २. | मिरज | १. भोसे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये एक | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| ३. | शिराळा | १. सोनवडे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| ४. | वाळवा | १. वाळवा | वाणिज्य विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी) / वाणिज्य महाविद्यालय |
| | | २. उरूण इस्लामपूर | १. विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी) |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | ३. विधी महाविद्यालय |
| | | ४. आष्टा | १. वास्तूशास्त्र महाविद्यालय |
| | | | २. शारिरीक शिक्षण महाविद्यालय |
| | | | ३. ललितकला महाविद्यालय |
| | | | ४. विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी) /विज्ञान महाविद्यालय |
| | | ५. कासेगांव | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी) / विज्ञान महाविद्यालय |
| | | ६. पेठनाका | विज्ञान महाविद्यालय |
| ५. | पलूस | १. कुंडल | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. भिलवडी | वाणिज्य विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | ३. तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| ६. | कडेगाव | १. कडेपूर | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ७. | आटपाडी | तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| ८. | खानापूर | १. खानापूर | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयासाठी)/ विज्ञान महाविद्यालय |
| | | २. विटा | विधी महाविद्यालय |
| ९. | तासगाव | तालुक्यामध्ये एक | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| १०. | कवठेमहांकाळ | तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| ११. | जत | १. संख | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | २. जाडरबोबलाद | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | ३. तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |

## सातारा जिल्हा

| अ.क्र. | शहर / तालुका | प्रस्तावांची स्थळे | महाविद्यालय/विद्याशाखा तपशिल |
|---|---|---|---|
| I | II | III | IV |
| १. | सातारा शहर | सातारा शहर | १. शारीरिक शिक्षण महाविद्यालय |
| | | | २. इन्स्टिट्युट ऑफ कॉम्प्युटर सायन्स |
| | | | ३. विधी महाविद्यालय |
| | | | ४. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| २. | सातारा तालुका | १. नागठाणे | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ३. | वाई | तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. वास्तूशास्त्र महाविद्यालय |
| | | | २. औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| | | | ३. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ४. | खंडाळा | १. शिरवळ | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| ५. | कोरेगाव | १. वाठार स्टेशन | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ६. | फलटण | १. फलटण | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| ७. | कराड | १. उंब्रज | वाणिज्य विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महिला महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय |
| ८. | पाटण | १. तळमावले | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तारळे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | ३. तालुक्यामध्ये एक | कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| ९. | माण | तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| | | | २. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| १०. | खटाव | १. वडूज | विज्ञान विद्याशाखा (अस्तित्वात असलेल्या एका महाविद्यालयासाठी ) |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (अंतराचा निकष लागू राहील) |
| ११. | जावळी | १. मौजे अंधारी / कास | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | २. तालुक्यामध्ये एक | कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| १२. | महाबळेश्वर | तालुक्यामध्ये प्रत्येकी एक | १. कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय |
| | | | २. हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्युट (पदवी स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमांसाठी ) |
| १३. | इन्स्टिट्युट फॉर शुगर ॲण्ड अलाईड प्रोडक्टस् टेक्नॉलॉजी | साखर कारखाना असलेल्या ठिकाणी तसेच अशा प्रकारच्या दोन महाविद्यालयांमध्ये किमान ४० कि.मी. चे अंतर असणे आवश्यक. | |
| १४. | जिल्हयात एका ठिकाणी | पी.जी. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी | |

## शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ या पाच वर्षाच्या सम्यक योजनेस (बृहत आराखडा) अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता सादर करावयाच्या विविध शैक्षणिक प्रस्तावांसाठीची वार्षिक योजना

### भाग - २ - विविध शाखांशी संबंधीत नवीन अभ्यासक्रम / विषयांची माहिती

**कला शाखा**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव (One of the subjects / Entire) | शेरा |
|---|---|---|
| 1. | B.A. (Mass Communication) | सदर अभ्यासक्रम आवश्यकतेनुसार स्थानिक, भौगोलिक परिस्थिती अवलोकनी घेवून महाविद्यालयांमध्ये सुरु करता येईल. |
| 2. | B.A. (Creative Writing) | |
| 3. | B.A. (Animation) | |
| 4. | B.A. (Drawing) | |
| 5. | B.A. (Music) | |
| 6. | B.A. (Fine Arts) | |
| 7. | B.A. (Dramatics) | |
| 8. | B.A. (Braille) | |
| 9. | B.A. (Defence Studies) | |
| 10. | B.A. (Criminology) | |
| 11. | B.A. (Rural Development) | |
| 12. | B.A. (Multimedia) | |
| 13. | B.A. (Yoga Studies) | |
| 14. | B.A. (Panchayat Administration) | |
| 15. | B.A./B.Sc. (Meteorology) | |
| 16. | B.A. (Micro Finance) | |
| 17. | B.A. (Civil Services) | |
| 18. | B.A. (Dress Making & Fashion Co-ordination) | |
| 19. | B.A. (Translation) | |
| 20. | B.A. ( Travel and Tourism) | |
| 21. | M.A. (International Relations) | |
| 22. | M.A. (Civil Services) | |
| 23. | M.A. (Socio-Anthropology) | |
| 24. | M.A. (Industrial Economics) | |

## वाणिज्य शाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव (One of the subjects / Entire) | शेरा |
|---|---|---|
| 1. | B.Com. (Information Technology) | |
| 2. | B.Com. (Business Logistics) | |
| 3. | B.Com. (Global Business) | |
| 4. | B.Com. (Global Finance) | |
| 5. | B.Com. (Agripreneurship) | |
| 6. | B.Com. (Foreign Trade) | |
| 7. | B.Com. (Forest Management) | |
| 8. | B.Com. (Hospitality Management) | |
| 9. | B.Com. (Hospital Management) | |
| 10. | B.Com. (Forex Management) | |
| 11. | B.Com. (Capital Market) | |
| 12. | B.Com. (Bank Management) | |
| 13. | B.Com. (Micro Enterprises) | |
| 14. | B.Com. (Rural Management) | सदर अभ्यासक्रम आवश्यकतेनुसार स्थानिक, भौगोलिक परिस्थिती अवलोकनी घेवून महाविद्यालयांमध्ये सुरु करता येईल. |
| 15. | B.Com. (Retail Management) | |
| 16. | B.Com. (Insurance) | |
| 17. | B.Com. (Entrepreneurship Development) | |
| 18. | B.Com. (Human Resource) | |
| 19. | B.Com. (Business Analytics) | |
| 20. | B.Com. (Financial Markets) | |
| 21. | B.Com. (E-Commerce) | |
| 22. | B.Com. (International Business and Finance) | |
| 23. | B.Com. (Business Studies) | |
| 24. | B.Com. (Business Management) | |
| 25. | B.Com. (Estate Valuation) | |
| 26. | B.Com. (Event Management) | |
| 27. | B.Com. (Travel and Tourism) | |
| 28. | B.Com. (Business Planning) | |
| 29. | B.Com. (Portfolio and Securities Management) | |
| 30. | P.G.Diploma in Industrial Project Consultancy | |

## विज्ञान शाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव (One of the subjects / Entire) | शेरा |
|---|---|---|
| 1. | B.Sc. (Food Processing) | सदर अभ्यासक्रम आवश्यकतेनुसार स्थानिक, भौगोलिक परिस्थिती अवलोकनी घेवून महाविद्यालयांमध्ये सुरु करता येईल. |
| 2. | B.Sc. (Animation) | |
| 3. | B.Sc. (Leather Technology) | |
| 4. | B.Sc. (Food Technology) | |
| 5. | B.Sc. (Food Processing & Packaging) | |
| 6. | B.Sc. (Forensic Science) | |
| 7. | B.Sc. (Sugar Technology) | |
| 8. | B.Sc. (Drug Chemistry) | |
| 9. | B.Sc. (Nano Technology) | |
| 10. | B.Sc. (Economics) | |
| 11. | B.Sc. (Remote Sensing) | |
| 12. | B.Sc. (Instrumentation) | |
| 13. | B.Sc. (Pharmacology) | |
| 14. | B.Sc. (Musiology) | |
| 15. | B.Sc. (Environmental Science) | |
| 16. | B.Sc. (Resource Management) | |
| 17. | B.Sc. (Ecology) | |
| 18. | B.Sc. (Metrology) | |
| 19. | B.Sc. (Fisheries) | |
| 20. | B.Sc. (Cyber Security) | |
| 21. | B.Sc. (Disaster Management) | |
| 22. | B.Sc. (Medicinal Chemistry) | |
| 23. | B.Sc. (Astrophysics & Space Science) | |
| 24. | B.Sc. (Food Science) | |
| 25. | B.Sc. (Home Science) | |
| 26. | B.Sc. (Water Management) | |
| 27. | B.Sc. (Bio-Technology) | |

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव (One of the subjects / Entire) | शेरा |
|---|---|---|
| 28. | B.Sc. (Geo Informatics) | सदर अभ्यासक्रम आवश्यकतेनुसार स्थानिक, भौगोलिक परिस्थिती अवलोकनी घेवून महाविद्यालयांमध्ये सुरु करता येईल. |
| 29. | B.Sc. (Food Science and Quality Control) | |
| 30. | B.Sc. (Sericulture) | |
| 31. | B.Sc. (Nutrition and Dietetics) | |
| 32. | B.Sc. (Agricultural Chemistry) | |
| 33. | B.Sc. (Medicinal Plants) | |
| 34. | B.Sc. (Applied and Industrial Biology) | |
| 35. | B.Sc. (Fruit Processing) | |
| 36. | B.Sc. (Renewable Energy) | |
| 37. | B.Sc. (Forestry) | |
| 38. | B.Sc. (Actuarial Science) | |
| 39. | B.Sc. (Industrial Safety) | |
| 40. | B.Sc. (Material Science) | |
| 41. | B.Sc. (Apiculture) | |
| 42. | B.Sc. (Aqua culture) | |
| 43. | B.Sc. (Biomedical) | |
| 44. | B.Sc. (Khadi Production and Design) | |
| 45. | PG Diploma in Milk & Milk Products | |
| 46. | PG Diploma in Green House Technology | |
| 47. | M.Sc. (Geo Informatics) | |
| 48. | M.Sc. (Industrial Micro-Biology) | |
| 49. | M.Sc. (Drug Chemistry) | |
| 50. | M.Sc. (Material Science) | |
| 51. | M.Sc. (Earth Science) | |
| 52. | M.Sc. (Instrumentation Electronics) | |
| 53. | M.Sc. (Carbon Trading and Transfer) | |
| 54. | M.Sc. (Designing and Gaming) | |
| 55. | M.Sc. (Data Science) | |

## अभियांत्रिकी शाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1. | B.E. (Instrumentation & Control) | सदर अभ्यासक्रम आवश्यकतेनुसार स्थानिक, भौगोलिक परिस्थिती अवलोकनी घेवून महाविद्यालयांमध्ये सुरु करता येईल. |
| 2. | B.E. (Material Science & Technology) | |
| 3. | Five years integrated M.E. Programme | |
| 4. | Bachelor of Design | |

## विधी शाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रस्तुत ठिकाण |
|---|---|---|
| 1. | पी.जी. डिप्लोमा इन टॅक्सेशन | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील संलग्नीत विधी महाविद्यालयांकरीता |
| 2. | पी.जी. डिप्लोमा इन सायबर लॉ | |

## शिक्षणशास्त्र शाखा

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रस्तुत ठिकाण |
|---|---|---|
| 1. | Post Graduate Diploma in Advanced ICT Applications in Education | कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील संलग्नीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकरीता |
| 2. | Post Graduate Diploma in Instructional Design & Technology | |
| 3. | Post Graduate Diploma in Guidance & Counselling | |

## संशोधन केंद्रे

| अभ्यासक्रमाचे नाव | प्रस्तुत जिल्हा |
|---|---|
| Center for Research / Innovation / Incubation | कोल्हापूर, सांगली, सातारा |
| Center of Excellence | कोल्हापूर, सांगली, सातारा |

ई-मेल व्दारे

# महाराष्ट्र शासन

क्रमांक —बृआमा-२०१७/प्र.क्र.३७६/ विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ३०.११.२०१७

प्रति,

कुलगुरु/कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मध्ये कलम ३०(४), ६२(२), ९९, १०९ (३) व १४६(१) मध्ये सुधारणा अध्यादेशानुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दि.१ मार्च, २०१७ पासून अंमलात आला आहे. उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार विद्यापीठाची विविध प्राधिकरणे व मंडळे घटित करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम १०९ मध्ये अंतर्भूत असल्याप्रमाणे, नविन महाविद्यालये सुरू करण्याबद्दलच्या परवानग्या दिल्या जात आहेत, याची देखिल सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. तथापि, विद्यापीठांना अधिनियमाच्या तरतूदींची अंमलबजावणी करतांना प्रारंभिक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्यामूळे विद्यापीठ प्राधिकरण व मंडळे घटित करण्यामध्ये उशिर होत असल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आले. म्हणून उक्त अधिनियमात खालीत सुधारणा करण्यात आल्या आहेत.

१. **कलम ३० ची सुधारणा:-** व्यवस्थापन परिषदेवर सर्व राखीव प्रवर्गातील व्यक्तींना यथोचित प्रतिनिधीत्व मिळेल याची सुनिश्चिती करण्यासाठी, उक्त कलम ३० च्या पोटकलम (४) च्या खंड (च), (छ), (ज) व (झ) या अन्वये निवडून आलेल्या सदस्यांच्या बाबतीत प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्याचा अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात आला आहे.

२. **कलम ६२ ची सुधारणा:-** प्रारंभिक मुदतीसाठी विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्य सदस्यांची निवडणूक, नामनिर्देशन व स्विकृतीची प्रक्रीया पूर्ण करणे विद्यापीठांना शक्य व्हावे यासाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्विकृतीची प्रक्रीया पूर्ण करण्यासाठीचा अंतिम दिनांक हा ३० नोव्हेंबर वरून दि.२८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत तात्पुरता वाढविण्याची सुधारणा करण्यात आली आहे.

३. **नविन कलम ९९ (क) समाविष्ट करणे:-** विद्यार्थ्यांचे लोकशाही हक्क सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ९९ (क) समाविष्ट करून त्याद्वारे २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी परिषद घटित करण्याकरिता तरतूदीची सुधारणा करण्यात आली आहे.

४. **कलम १०९ ची सुधारणा:-** विद्यापीठाने सादर केलेल्या सम्यक योजनेच्या मुद्द्यावर महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) बैठकीत मान्य झाल्याप्रमाणे दि. ९ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये तज्ञ समितीची नियुक्ती करण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसी माहेडने स्विकारल्याबाबतचे इतिवृत्त यासोबत जोडले आहे. सदरहू शिफारशी अंमलात आणण्यात येत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता

नविन महाविद्यालये सुरु करण्याकरीता परवानगी देण्यासाठी आखून दिलेल्या कालमर्यादेत सुधारणा करण्यात आली आहे. सबब सर्व अकृषी विद्यापीठांनी या बदलाची नोंद घेऊन सुधारीत कालबद्ध कार्यक्रमानुसार नवीन बिंदूसह सर्व बिंदूसाठी नव्याने जाहिरात प्रसिद्ध करुन इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच ज्या संस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडे अर्ज सादर केलेले असतील अशा संस्थांनी पुन्हा अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांनी यापूर्वी सादर केलेले अर्ज विचारात घेतले जातील याची नोंद घ्यावी व तसा जाहिरातीत खुलासा करावा. विद्यापीठांनी केलेल्या कार्यवाहीचा कालबद्ध अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५. **कलम १४६ (१) ची सुधारणा**:- विद्यमान विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण हे व्यवहार्य असेल तेथवर, परंतू, २८ फेब्रुवारी, २०१८ च्या अशा मुदतीच्या आत या अधिनियमाच्या तरतूदीनुसार पुनर्घटित करण्यात येईल अशी सुधारणा करण्यात आली आहे.

तरी, सर्व अकृषी विद्यापीठांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील उपरोक्त नमूद सुधारणांच्या अनुषंगाने आखून दिलेल्या कालमर्यादेत योग्य ती कार्यवाही करावी.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

आपला,

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मंबई
मा. मंत्री, (उ.व.तं.शि) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मंबई
मा. राज्यमंत्री, (उ.व.तं.शि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. अप्पर मुख्य सचिव,(उ.व.तं.शि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई
सर्व सह संचालक, उच्च शिक्षण

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची (माहेड) बैठक दिनांक २१-११-२०१७

## इतिवृत्त

१.मागील बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

२.मुंबई विद्यापीठाच्या बृहत आराखडयाला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

३.शासन निर्णय दिनांक ०९.१०.२०१७ रोजी गठीत केलेल्या बृहत आराखडयांची छाननी व पुनर्तपासणी समितीने सादर केलेल्या अहवालातील नव्याने समावेश करावयाच्या १३ बिंदू(स्थान) यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मान्यता देण्यात आली.

| क्र. | विद्यापीठाचे नांव | जिल्हा | तालुका | तालुका प्रस्तावित महाविद्यालयांची संख्या | प्रस्तावित महाविद्यालयाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | अहमदनगर | कोपरगांव | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय. |
| | | पुणे | बारामती | ०२ | कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय |
| | | पुणे शहर | पुणे | ०१ | फॅशन डिझाइनिंग महाविद्यालय |
| | | नाशिक | मालेगाव | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| २ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | औरंगाबाद | सिडको | ०१ | बी.एस्सी हॉटेल ऑपरेशन ॲन्ड केटरींग सायन्स महाविद्यालय. |
| | | बीड | केज | ०१ | ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय |
| ३ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | मुंबई | वडाळा | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | | मुंबई उपनगर कांदिवली पुर्व | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | | ओशिवरा जोगेश्वरी | ०१ | विधी महाविद्यालय |
| ४ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | चंद्रपूर | वडसा देसाईगंज | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय. |
| ५ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | कोल्हापूर | आजरा | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय. |
| | | | राधानगरी | ०१ | कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय. |

४. तसेच महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोग यांना शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्था व मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून नव्याने प्राप्त झालेल्या मुंबई विद्यापीठाकरिता ठाणे जिल्हयातील मिराभाईंदर महानगरपालिका हददीत एक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच ठाणे जिल्हयातील वाशी येथे एक विधी महाविद्यालय बृहत आराखडयात अंतर्भाव करण्यास मान्यता देण्यात आली.

५ विद्यापीठांनी सादर केलेल्या पंचवार्षिक सम्यक योजनांना (बृहत आराखडे) शासन निर्णय दिनांक ०९.१०.२०१७ रोजी नियुक्त केलेल्या समितीला मुदतवाढ देण्यात यावी. समिती सदस्यांमध्ये बदल करावयाचा झाल्यास समिती अध्यक्षांच्या संमतीने अदला बदल करण्यास त्यांना मुभा देण्यात यावी.

६.शेवटी सर्वांचे आभार मानण्यात आल्यानंतर बैठक संपली.

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ५६] मंगळवार, नोव्हेंबर २८, २०१७/अग्रहायण ७, शके १९३९ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक १०४

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | १-५ |

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर २०१७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XXVIII OF 2017.**

AN ORDINANCE

TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यांत यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१७ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३० ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ६.

" परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर व्यवस्थापन परिषदेच्या प्रारंभीच्या मुदतीसाठी, खंड (च), (छ), (ज) व (झ) खालील प्रवर्गांमधील उमेदवाराच्या निवडणुकीकरिता उक्त खंडांन्वये राखीव प्रवर्गांचे आळीपाळीने देण्यात येणारे आरक्षण हे, कुलगुरूकडून चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल, आणि अशा चिठ्ठ्यांची सोडत काढताना, प्रत्येक राखीव प्रवर्गातील व्यक्तीला व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधित्व मिळेल, याची सुनिश्चिती करण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर विद्यापीठ प्राधिकरणांच्या प्रारंभिक मुदतीसाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया अशा प्रारंभाच्या दिनांकानंतर लगेच पुढच्या २८ फेब्रुवारीच्या आत पूर्ण करण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यामध्ये नवीन कलम ९९क समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ९९ नंतर, पुढील कलम जादा दाखल करण्यात येईल :—

विद्यार्थी परिषद घटित करण्यासाठी तात्पुरती तरतूद.

" **९९क.** कलम ९९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी, विद्यार्थी परिषद घटित करण्याच्या संबंधात, पुढील तरतूद लागू होईल :—

(१) विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी वेगवेगळ्या विद्यार्थी संघटनांच्या पाठ्येतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता, पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे, एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल, विद्यापीठाच्या विभागांसाठी, एक विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद असेल आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी किंवा प्रत्येक संलग्न महाविद्यालयासाठी, एक विद्यार्थी परिषद असेल. या परिषदा राजकीय चळवळींमध्ये भाग घेणार नाहीत.

(२) (क) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू—अध्यक्ष ;

(दोन) विद्यार्थी विकास संचालक—सभापती ;

(तीन) संचालक, क्रीडा व शारीरिक ;

(चार) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना ;

(पाच) मागील पदवी परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि जो एखाद्या विद्यापीठात, परिसंस्थेत किंवा विभागात किंवा संचालित महाविद्यालयात पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला प्रत्येक विद्यापीठ विभागातील एक विद्यार्थी ;

(सहा) प्र-कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी आणि जर प्र-कुलगुरू नसेल तर, कुलगुरू दोन विद्यार्थिनींना नामनिर्देशित करील.

(ख) प्रत्येक परिसंस्थेच्या, संचालित महाविद्यालयाच्या किंवा संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) प्राचार्य—सभापती ;

(दोन) प्राचार्याने नामनिर्देशित केलेला एक अधिव्याख्याता ;

(तीन) राष्ट्रीय छात्र सेनेचा प्रभारी अध्यापक ;

(चार) राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रम अधिकारी ;

(पाच) मागील वर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि महाविद्यालयात जो पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, प्राचार्याने नामनिर्देशित केलेला प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थी ;

(सहा) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, कोणताही असल्यास ;

(सात) ज्याने लक्षणीय यश मिळविले आहे असा, प्राचार्याने नामनिर्देशित केलेला पुढील क्षेत्रातील प्रत्येकी एक विद्यार्थी :—

(१) क्रीडा ;

(२) राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रौढ शिक्षण ;

(३) राष्ट्रीय छात्र सेना ;

(४) सांस्कृतिक कार्ये ;

(आठ) प्राचार्याने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी :

परंतु, प्रवर्ग (सात) व (आठ) मधील दोन विद्यार्थी, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांमधील असतील.

(३) या दोन्ही परिषदांचे विद्यार्थी सदस्य आपल्यामधूनच संबंधित परिषदेचा सचिव निवडतील.

(४) (क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे पोट-कलम (३) खालील संबंधित परिषदांच्या सचिवांमधून निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या पंधराहून अधिक नसतील अशा व्यक्तींचा समावेश असलेली एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल :

परंतु, यापैकी प्रत्येकी किमान एक जागा पुढील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येईल :—

(एक) अनुसूचित जाती ;

(दोन) अनुसूचित जमाती ;

(तीन) विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती ;

(चार) इतर मागासवर्ग ; आणि

(पाच) एक जागा विद्यार्थीनींसाठी,

उरलेल्या जागांचे जिल्हानिहाय वाटप करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्याकरिता, शैक्षणिक कामगिरी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना व प्रौढ शिक्षण, सांस्कृतिक कार्य किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये यांमधील सहभाग यासंबंधातील तपशील विचारात घेण्यात येईल.

(ख) अशाप्रकारे रचना करण्यात आलेली विद्यापीठ विद्यार्थी परिषद, स्वतःच आपला सभापती व सचिव निवडील ;

(ग) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या प्रत्येक बैठकीमध्ये कुलगुरू हा, अध्यक्षस्थानी असेल व विहित करण्यात येतील असे इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित असतील.

(५) कोणताही विद्यार्थी त्याची पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी झाली असेल तरच कोणत्याही विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असेल.

(६) २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांचे नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेने निश्चित केल्या जाणाऱ्या दिनांकास करण्यात येईल. नामनिर्देशित विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा नामनिर्देशनाच्या दिनांकापासून सुरू होईल आणि तो पदावधी, दरम्यानच्या कालावधीत अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढवून घेतलेल्या नसतील तर, शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत अंमलात असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल.

(७) परिषदेच्या एक-तृतीयांश सदस्य मिळून बैठकीची गणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीचे नियम व कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. परिषदेची दर तीन महिन्यांमध्ये किमान एक बैठक होईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ च्या, पोट-कलम (३) मध्ये, खंड (घ) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :–

" परंतु आणखी असे की, विद्यापीठास नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी मागणाऱ्या अर्जावर निर्णय घेणे सोयीचे व्हावे यासाठी, या अधिनियमाच्या, प्रारंभाच्या लगतनंतरच्या पहिल्या शैक्षणिक वर्षासाठी यासोबतच्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) आणि (घ) यांमध्ये निर्देशिलेले दिनांक हे उक्त तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :-

तक्ता

| खंड | विद्यमान तरतुदीमधील दिनांक | २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | वर्षाच्या सप्टेंबर महिन्याचा शेवटचा दिवस | १५ डिसेंबर २०१७ |
| (ग) | वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी | १५ जानेवारी २०१८ पूर्वी |
| (घ) | लगेच पुढच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी | २८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी ". |

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १४६ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१) विद्यमान विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण हे, व्यवहार्य असेल तेथवर, परंतु २८ फेब्रुवारी २०१८ च्या अशा मुदतीच्या आत या अधिनियमाच्या तरतुदींनुसार पुनर्घटित करण्यात येईल. असे प्रत्येक प्राधिकरण हे, कुलगुरू अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून पुनर्घटित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. ".

## निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) हा, दिनांक १ मार्च २०१७ पासून अंमलात आला आहे. अशा प्रारंभानंतर, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची विविध प्राधिकरणे व मंडळे घटित करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम १०९ मध्ये अंतर्भूत असल्याप्रमाणे, नवीन महाविद्यालय सुरू करण्याबद्दलच्या परवानग्या दिल्या जात आहेत, याचीदेखील सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. तथापि, विद्यापीठांना अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना प्रारंभिक अडचणींना तोंड द्यावे लागत असून त्यामुळे विद्यापीठ प्राधिकरणे व मंडळे घटित करण्यामध्ये उशीर होत असल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. म्हणून, उक्त अधिनियमात तात्काळ सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) **कलम ३० ची सुधारणा.**—व्यवस्थापन परिषदेवर सर्व राखीव प्रवर्गातील व्यक्तींना यथोचित प्रतिनिधित्व मिळेल याची सुनिश्चिती करण्यासाठी, उक्त कलम ३० च्या पोट-कलम (४) च्या खंड (च), (छ), (ज) व (झ) यांअन्वये निवडून आलेल्या सदस्यांच्या बाबतीत, प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्याचा अधिकार कुलगुरूला प्रदान करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(दोन) **कलम ६२ ची सुधारणा.**—प्रारंभिक मुदतीसाठी विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या सदस्यांची निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करणे विद्यापीठांना शक्य व्हावे यासाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठीचा अंतिम दिनांक हा, ३० नोव्हेंबरवरून २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत तात्पुरता वाढविण्याचे प्रस्तावित केले आहे.

(तीन) **नवीन कलम ९९क समाविष्ट करणे.**—विद्यार्थ्यांचे लोकशाही हक्क सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, नवीन कलम ९९क समाविष्ट करून त्याद्वारे २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी परिषद घटित करण्याकरिता तरतुदी करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(चार) **कलम १०९ ची सुधारणा.**—विद्यापीठाने सादर केलेल्या सम्यक योजनेच्या, मुद्यांवरील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या तज्ज्ञ समितीची शिफारस अंमलात आणण्यात येत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी, २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देण्यासाठी आखून दिलेल्या कालमर्यादेत सुधारणा करण्यात येत आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २६ नोव्हेंबर २०१७.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सीताराम कुंटे,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# माहितीपत्रक

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव व शुल्क सादर करणेबाबत माहितीपत्रक

**नवीन संलग्नीकरण -**

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने दिनांक २८.११.२०१७ च्या सुधारित अध्यादेश क्रमांक २८ नुसार माहे जून, २०१८ (शैक्षणिक वर्ष २०१८-१९) पासून पदवी व पदव्युत्तर स्तरावरील नवीन महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थां संदर्भातील प्रस्ताव व शुल्क संस्थांनी विद्यापीठास सादर करण्याची **अंतिम तारीख १५ डिसेंबर, २०१७ अशी आहे. शुल्क व प्रस्ताव एकत्र व एकाचवेळी सादर करणे आवश्यक आहे. शुल्क बँकेत जमा करून प्रस्ताव दि.१५/१२/२०१७ नंतर सादर करता येणार नाही. तसेच पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव व शुल्कावर पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. तसेच विलंबाने पोहोच होणा-या प्रस्तावांवरही पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.**

२. नवीन महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांसाठीचे प्रस्ताव विद्यापीठाच्या विहित नमुन्यात/विहित शुल्कासह/विहित कालावधीमध्ये एका (१) मुळ प्रतीमध्ये व शासनाच्या विहित नमुन्यात एक (१) मुळ प्रत व दोन (२) छायांकित प्रतींमध्ये **दि.१५ सप्टेंबर, २०१७** च्या शासन निर्णयात नमुद केलेली आवश्यक ती कागदपत्रे योग्य त्या क्रमाने जोडून त्यास पाठपोठ पृष्ठ क्रमांक लिहून दोन स्वतंत्र फाईलमध्ये विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करावेत.

३. सदरचे प्रस्ताव सादर करताना विद्यापीठाच्या विहित नमुन्यातील प्रस्तावाची मुळ प्रत व शासनाच्या विहित नमुन्यातील प्रस्तावाची मुळ प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **एकत्रितपणे एका लेस फाईलमध्ये** सादर करावी व शासनाच्या विहित नमुन्यातील उर्वरीत दोन प्रती (आवश्यक त्या कागदपत्रांसह) दुस-या लेस फाईलमध्ये सादर कराव्यात.

४. सदरच्या फाईलवर संबंधीत संस्थेचे नाव, पत्ता, संपर्काचे दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक, फॅक्स तसेच ई-मेल ॲड्रेस इत्यादी माहिती नमुद करावी व प्रस्तावाचे स्वरुप (उदा. नवीन महाविद्यालय - कला, वाणिज्य व विज्ञान) ठळक अक्षरात सुस्पष्टपणे नमुद करावे.

५. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयामध्ये २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये (पारंपारिक/व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार नवीन महाविद्यालयांसाठी इरादा पत्र प्राप्त होण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावेत. शासन निर्णयातील निर्देशित कार्यपध्दतीची पूर्तता करणारे प्रस्तावच विद्यापीठाकडून स्विकारले जातील. (शासन निर्णयामध्ये ज्या-ज्या ठिकाणी नोंदणीकृत कागदपत्र/दस्तऐवज असा उल्लेख आहे, त्याबाबत मा.दुय्यम उपनिबंधक, दस्त नोंदणी कार्यालय यांच्या सहीचे नोंदणीकृत कागदपत्र/ दस्तऐवज बंधनकारक आहे.)

६. प्रस्तावासोबत सादर करण्याचा मुखपत्राचा (Covering Letter) मसुदा सोबत जोडला आहे. प्रस्ताव फक्त त्याप्रमाणेच स्विकारण्यात येतील. अपूर्ण प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

७. सदरचा शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर **BCUD→Affiliation T-2 'Information/Lists'** येथे उपलब्ध आहे.

टिप - १. शासन निर्णयानुसार सादर करावयाच्या परिशिष्ट "ब" प्रमाणे कागदपत्रांविषयी मुद्देसुद माहिती व्यवस्थित वाचून त्याप्रमाणे कागदपत्रे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

२. प्रस्ताव सादर करण्याच्या शेवटच्या काही दिवसात विद्यापीठात होणारी गर्दी व उपलब्ध वेळ याचा विचार करून गैरसोय टाळण्यासाठी संबंधीतांनी प्रस्ताव मुदतीच्या अखेरच्या टप्प्यापूर्वी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

पुढे चालू .....

क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयामध्ये २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठी नमुद केलेल्या परिशिष्ट 'ब' मधील तपासणी सुचीच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांविषयी (इरादा पत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची)

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची | परिशिष्ट "ब" तपासणीसुचीनुसार सादर करावयाच्या कागदपत्रांविषयी माहिती |
|---|---|---|
| १ | नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र मागणारा संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर,२०१७ मधील परिशिष्ठ 'अ' (अर्जाचा नमूना) नूसार विहित अर्जाचा नमूना व त्यामधील अ.क्र. १ ते १८ मुद्दयाबाबतची संपूर्ण माहिती भरुन सादर करावा.<br>जाहिरातीमध्ये नमूद केल्यानुसार प्रस्तावांच्या प्रती **DVB-TT - Surekh या फॉन्टमध्ये सीडी व Hard Copy मध्ये सादर करणे आवश्यक आहे.** |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय व दुय्यम सहाय्यक निबंधक यांचे संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ३ | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत. | धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी प्रमाणित केलेली संस्थेच्या घटनेची प्रत सादर करणे आवश्यक. |
| ४ | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत | सन २०१७-१८ या लेखा वर्षाचे अंदाजपत्रक जोडणे आवश्यक. |
| ५ | संस्थेच्या **मागील पाच वर्षाच्या अंकेक्षित आर्थिक लेखे-जोखे व लेखापरिक्षण** अहवालाच्या प्रती. याआधारे नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या विकास योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणा-या आर्थिक स्त्रोतांबाबत स्वयंस्पष्ट माहिती. | मागील पाच वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे. |
| ६ | संबंधीत संस्थेचे आर्थिक व्यवहार **राष्ट्रीयकृत/शेडयुल** बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत अथवा शेडयूल बँकेमार्फतच केले जात असल्याची कागदपत्रे सादर करावीत. |
| ७ | पुढीलप्रमाणे किमान ५ वर्षे, किमान मुदत ठेवची (Fix Deposit) ची प्रमाणित प्रत.<br>अ) विधी महाविद्यालय - रू.१५.०० लाख<br>ब) पारंपारिक महाविद्यालय - रू.७.०० लाख<br>(उदा. कला, विज्ञान, वाणिज्य इ.) | राष्ट्रीयकृत अथवा शेडयूल बँकेतीलच कमीत कमी ५ वर्ष मुदतीची विहित रकमेची फिक्स डिपॉझिटची प्रमाणित प्रत संबंधीत प्रस्तावांसाठी सादर करावी. |
| ८ | संबंधित संस्थेने राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेमध्ये ठेवलेला ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय न काढण्याबाबतचे संबंधित **राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र.** | अं. क्र. ७ मधील ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्व परवानगीशिवाय न काढण्याबाबतचा बँक व संस्था यांच्या संयूक्त आश्वासन पत्राचा नमूना विद्यापीठाच्या संकेत स्थळावर ठेवला आहे. सदर नमून्यातील संयुक्त आश्वासन पत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ९. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, मंजूर करण्यात येणा-या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर **नोंदणीकृत हमीपत्र.** | **तहसिलदार (Excutive Magistrate) अथवा नोटराईज्ड केलेले हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.** |
| १०. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात असेल तर अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. | अस्तित्वात असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. |
| ११. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादा पत्र मागणा-या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणा-या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>अ) मुलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत.<br>ब) अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपलब्ध आहेत.<br>याबाबत संस्थेचे संबधित अकृषी विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | संस्थेची सद्यस्थितीत महाविद्यालये अस्तित्वात असल्यास सदर महाविद्यालयामध्ये मुलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध असल्याबाबतची कागदपत्रे सादर करावीत. तसेच अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नियुक्ती पत्रे सादर करावीत. |
| १२. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादा पत्र मागणा-या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक/एनबीए मानांकन व मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. | अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक/एनबीए मानांकन व मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक. |

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची | परिशिष्ट `"ब"` तपासणीसुचीनुसार सादर करावयाच्या कागदपत्रांविषयी माहिती |
| --- | --- | --- |
| १३. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या वार्षिक योजनेमध्ये निश्चित निश्चित केलेल्या बिंदूच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे -<br>१) **स्वत:ची जागा**<br>अ) **"अ"**, **"ब"** आणि **"क"** वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये ½ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची **प्रमाणित प्रत.**<br>**ब) "अ"**, **"ब"** आणि **"क"** वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी.परीसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची **प्रमाणित प्रत.**<br>क) **"ड"** वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची **प्रमाणित प्रत.**<br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रासाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या **सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.**<br><br>२) **भाड्याची जागा** -(किमान ५ वर्षासाठी भाडेकरारनामा)<br>अ) **"अ"** **"ब"** आणि **"क"** वर्ग महानगरपालिका क्षेत्रात **½** एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडे तत्त्वावर घेतलेल्या **नोंदणीकृत कराराची प्रत.**<br>**ब) "अ"**, **"ब"** आणि **"क"** वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी.परीसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या **नोंदणीकृत कराराची प्रत.**<br>क) **"ड"** वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या **नोंदणीकृत कराराची प्रत.**<br>**ड)** उर्वरित सर्व क्षेत्रासाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या **नोंदणीकृत कराराची प्रत.** | **स्वत:च्या जागेसंदर्भातील कागदपत्रे**<br>१) संबंधित क्षेत्रातील दुय्यम उपनिबंधक यांचे समोर संस्थेच्या नावे केलेले नोंदणीकृत खरेदीपत्र.<br>२) जागेसंबधी N.A. Order.<br>३) जागेचा (Final Layout) मंजूर नकाशा.<br>४) संस्थेच्या नावे सातबारा उतारा/प्रॉपर्टी कार्ड.<br>५) डायरी उतारा.<br>६) बांधकाम असल्यास Assesment उतारा.<br>७) जागेसंबंधीच्या संबधीत शासकीय कार्यालयाने प्रमाणित केलेला नकाशा.<br>८) नवीन बांधकाम असल्यास संबधित महानगरपालिका/ नगरपालिका/ग्रामपंचायत यांच्याकडून बांधकाम मंजूर नकाशा आणि भोगवटा प्रमाणपत्र<br><br>**भाडयाच्या जागेसंदर्भातील कागदपत्रे,**<br>१) संबधित दुय्यम उपनिबंधक यांचेसमोर संस्थेच्या नावे केलेले नोंदणीकृत भाडे करारपत्र.<br>२) N.A. Order<br>३) Final Layout Plan<br>४) जागेसंबंधीच्या संबधीत शासकीय कार्यालयाने प्रमाणित केलेला नकाशा. |
| १४. | प्रस्तावित महाविद्यालयासाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेला नकाशा | |
| १५. | प्रस्तावित महाविद्यालयाकरीता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्त्रोत तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणूकीसंदर्भातील तसेच त्याकरीताच्या वित्तीय तरतूदीचे नियोजन. | |
| १६. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्षे कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. | |
| १८. | इरादापत्र ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तीची पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यत करण्यात येईल, असे संस्थेचे हमीपत्र. | |

महत्त्वाची टिप :-

अ) वरील सर्व कागदपत्रे साक्षांकित करून सादर करावीत.

ब) कार्यसुलभतेसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर खालील कागदपत्रे ठेवली आहेत.

१) वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली जाहिरात.

२) विस्तृत जाहिरात

३) सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत आराखडा

४) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीची सुधारित वार्षिक योजना (माहेड मान्यताप्राप्त नवीन बिंदूसह)

५) मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक- बृआमा-२०१७/प्र.क्र.३७६/विशि-३, दि.३०/११/२०१७ चे पत्र, सदर पत्रासोबतचे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) दि.२१/११/२०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता सन २०१७ चा दि.२८ नोव्हेंबर, २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८

७) शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर,२०१७

८) मुखपत्राचा मसुदा

९) संयुक्त आश्वासनपत्र.

सबब सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त कागदपत्रे अवलोकनी घेवून प्रस्ताव सादर करावेत.

# मुखपत्राचा मसुदा

प्रति,

मा. कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संस्थेचे नाव:-

महाविद्यालयाचे नाव :-

अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाबाबत संलग्न महाविद्यालय स्थापना वर्ष :-

नॅक मुल्यांकन/पुनर्मुल्यांकनाचे वर्ष, श्रेणीसह :-

| प्रस्ताव प्रकार | महाविद्यालयाचा प्रकार |
|---|---|
| नवीन महाविद्यालय | |

## तपासणी सुची

| अ.क्र | शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७ नुसार नविन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठीची तपासणी सुची परीशिष्ट - ब | पुर्ततेचा तपशील (होय/नाही) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र मागणारा संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलावार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या अंकेक्षित आर्थिक लेखे-जोखे व लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती. या आधारे नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या विकास योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणा-या आर्थिक स्त्रोतांबाबत स्वयंस्पष्ट माहिती. | | |
| ६. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ७. | पुढीलप्रमाणे किमान ५ वर्ष, किमान मुदत ठेवची (Fix Deposit) प्रमाणित प्रत.<br>अ) विधी महाविद्यालय : रु.१५.०० लाख<br>ब) पारंपारीक महाविद्यालय : रु.७.०० लाख<br>(उदा.कला, विज्ञान, वाणिज्य इ.) | | |
| ८. | संबंधित संस्थेने राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला मुदत ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता,मंजुर करण्यात येणा-या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात असेल तर अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. | | |
| ११. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणा-या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>अ) मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>ब) अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | | |

| अ.क्र | शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७ नुसार नविन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठीची तपासणी सुची परीशिष्ट - ब | पुर्ततेचा तपशील (होय/नाही) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १२. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन / पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक / एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. | | |
| १३. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या संस्थेने बृहत आराखड्यामध्ये निश्चित केलेले बिंदुच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे.<br>**१) स्वत:ची जागा -**<br>अ) "अ","ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>ब) "अ","ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>क) "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>ड) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>**२) भाड्याची जागा - (किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>अ) "अ","ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>ब) "अ","ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>क) "ड" वर्ग महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>ड) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर अकृषक जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | | |
| १४. | प्रस्तावित महाविद्यालयांसाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेल्या नकाशा. | | |
| १५. | प्रस्तावित महाविद्यालयाकरिता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्त्रोत. तसेच, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीसंदर्भातील तसेच त्याकरिताच्या वित्तीय तरतुदीचे नियोजन. | | |
| १६. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. | | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्ष कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. | | |
| १८. | इरादापत्र ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तीच्या पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत करण्यात येईल, असे संस्थेचे हमीपत्र. | | |

**टिप :- पृष्ठ क्रमांक पाठपोठ लिहावेत.**

**शासन / विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे उपरोक्त बाबतची कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव व प्रस्ताव शुल्क सोबत सादर करीत आहोत. कृपया स्विकार व्हावा ही विनंती.**

आपला विश्वासू

शिक्का

सही
(अध्यक्ष / सचिव)

# संस्था अध्यक्ष / संचालक व राष्ट्रीयकृत / शेडयुल बँक यांचे संयुक्त आश्वासनपत्र

मी,-----------------------------------------------------------------------------------सचिव/अध्यक्ष---------------------------
-------------------------------------- सदरचे आश्वसन पत्र लिहून देतो की, आमच्या संस्था ---------------------------------------------
------------------------------------या ठिकाणी ------------------- जून, २०१८ पासून नवीन महाविद्यालय सुरू करण्याचे नियोजित केले असून सदरहू प्रस्तावासाठी ---------------------------------------------------------------------------------------------------------------
बँक शाखा -------------------------------------------------------या बँकेत रू----------------------/- (रू.---------------लाख फक्त)
(रिसिट क्रमांक-----------------------------) शासन / विद्यापीठ नियमाप्रमाणे ठेव रूपाने ठेवले आहेत.

सदरच्या ठेवीतून विद्यापीठाच्या पूर्व परवानगीविना अंशत: अथवा पूर्णत: रक्कम काढली जाणार नाही, तसेच या ठेवीवर कोणत्याही रूपाने कर्जही काढले जाणार नाही.

दिनांक : ( )

संस्था अध्यक्ष /सचिव

मी, ---------------------------------------------------------------------- व्यवस्थापक---------------------------
शाखा --------------------------------- सदरचे आश्वसन पत्र लिहून देतो की, आमच्या बँकेत -------------------------------------------
---------------------------------या संस्थेच्या अध्यक्षांनी/सचिवांनी विद्यापीठ नियमाप्रमाणे रू.---------------------/- (रू.------------ फक्त)
(रिसिट क्रमांक----------------------------) ठेव रूपाने ठेवले आहेत.

सदरच्या ठेवीतून विद्यापीठाच्या पूर्व परवानगीविना कोणासही अंशत: अथवा पूर्णत: रक्कम काढू दिली जाणार नाही, अथवा ठेवीवर कोणासही कोणत्याही रूपाने कर्ज दिले जाणार नाही.

दिनांक :

व्यवस्थापक
संबंधित राष्ट्रीयकृत /शेडयुल बँक

टिप - संयुक्त आश्वासनपत्र एकाच कागदावर आवश्यक आहे. दोन स्वतंत्र कागदावर केलेले पत्र मान्य होवू शकत नाही.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालयांना (पारंपारिक व व्यावसायिक) मंजुरी देण्यासाठी कार्यपद्धती व निकष विहित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५ सप्टेंबर, २०१७.

वाचा :-१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.
२) शासन निर्णय क्र. एनजीसी-२००९/(३०१/०९)/मशि-४, दि.२५.९.२००९
३) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१०/(१९३/१०)/मशि-४, दि.३०.१०.२०१०
४) शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१२/(२४७/१२)/मशि-४, दि.२.९.२०१३.

प्रस्तावना:-

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता वाढविण्यासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६" अंमलात आणलेला आहे. सदर अधिनियमातील कलम १०९ (१) (२) (३) नुसार नवीन महाविद्यालय मंजुरीसाठी कालबद्ध तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, या तरतुदीस अनुसरुन अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित करावी, अशी तरतूद कलम १०९ (९) अन्वये करण्यात आली आहे. सदरहू तरतुदींच्या अनुषंगाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय (पारंपारीक व व्यावसायिक) मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.२,३ व ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय:-

१. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

कार्यपद्धती :- (इरादापत्राकरिता)

१.१ विद्यापीठांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उच्च शिक्षणाच्या सुविधांचे सर्वत्र समान वाटप होण्यासाठी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०७ मधील तरतुदीनूसार एक सम्यक योजना (Perspective Plan) तयार करावी.

१.२ सर्व विद्यापीठांनी पाच वर्षांचा बृहत आराखडा करावा, त्यामध्ये ज्या जिल्ह्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षणात ढोबळ पटसंख्या प्रमाण (जीईआर) राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे असे जिल्हे, नक्षलग्रस्त, आदिवासी, डोंगराळ /दुर्गम भागासाठी सर्वोच्च प्राथम्य द्यावे व त्या प्राथम्यक्रमानुसार व तद्नंतर सर्वसाधारण याप्रमाणे त्या-त्या शैक्षणिक वर्षासाठी विशिष्ट एवढ्याच नवीन महाविद्यालयांच्या (व्यावसायिक (AICTE व NCTE मंजुरी देत असलेले व्यावसायिक अभ्यासक्रम सोडून) व पारंपारिक) प्रस्तावांची शिफारस करावी.

१.३ सदर सम्यक योजना महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाकडून मान्य करुन घ्यावी.

१.४ सम्यक योजनेस अनुसरुन विद्यापीठांनी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी वार्षिक योजना तयार करावी.

१.५ वार्षिक योजनेत समावेश असलेल्या ठिकाणांसाठीचे बिंदु निश्चित केल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी बृहत आराखडयातील ठिकाणासह वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. बृहत आराखडयाबाहेरच्या ठिकाणासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करण्यात यावा व तसे अर्ज स्वीकारु नयेत.

१.६ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणा-या इच्छूक संस्थांनी "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६" च्या कलम १०९ (३) (क) मधील तरतुदीनुसार सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित विद्यापीठाकडे, ज्यावर्षी इरादापत्र मागविले असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी अर्ज दाखल करावेत. त्यासोबत परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

१.७ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशीलसूची तयार करुन आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज स्वीकारावेत. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

१.८ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

१.९ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार करुन, छाननी समिती त्यांचा अहवाल कुलगुरुंना सादर करेल.

१.१० ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

१.११ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१.१२ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

१.१३ आवश्यकता असल्यास कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. अशी तज्ज्ञ समिती गठित केल्यास ही समिती त्यांचा अहवाल अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल.

१.१४ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

१.१५ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर कुलगुरु निर्णय देतील.

१.१६ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट "अ" व "ब" तसेच प्रपत्र "अ" व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे दिनांक ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी सादर करण्यात येतील.

१.१७ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या व शासनस्तरावर छाननीअंती अंतिम पात्र ठरलेल्या प्रस्तावासंदर्भात शासनाकडून लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादापत्र देण्यात येईल.

१.१८ वरील परि. १.७ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. १.१२ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

१.१९ विद्यापीठांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविताना त्यात नवीन पारंपारिक / व्यावसायिक महाविद्यालये असे वर्गीकरण केलेले असेल.

२. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

निकष :- (इरादापत्र)

२.१ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(२) नुसार, कलम १०७ अन्वये तयार केलेल्या सम्यक योजनेशी सुसंगत नसेल, असे उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा कोणताही अर्ज विद्यापीठाकडून विचारात घेतला जाणार नाही.

२.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(३)(ख) अनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करतील आणि विहित कालावधीत प्राप्त होतील, केवळ असेच अर्ज विद्यापीठाकडून स्वीकारण्यात येतील आणि विचारात घेण्यात येतील.

२.३ ज्या संस्थांची यापूर्वीची महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांचेबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या संस्थांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करु नयेत.

अ) ज्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्यासहित सर्व अध्यापकांची पदे अर्हताधारक व पात्र उमेदवारामधून भरलेली नसतील तर तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार भौतिक सुविधा उपलब्ध नसतील तर,

ब) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तीचे तसेच, यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-"अ" व "ब" ची पूर्तता करत नसतील तर,

क) मूल्यांकन / पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र महाविद्यालयांच्या बाबतीत एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्विकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्विकृती मंडळाकडून अधिस्विकृती किंवा पुनर्रअधिस्विकृती करण्यात आली नसेल तर,

परंतु, ज्या महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन / पूनर्मूल्यांकन होऊ शकलेले नाही, अशा महाविद्यालयांची या संदर्भातील लेखी कारणे नमूद करुन त्यांचे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत.

२.४ शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालय सुरु करण्यासाठी राहील.

२.५ सदर इरादापत्र हे संस्थेने नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता प्राप्त करण्यापूर्वी विहित अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या दृष्टिने दिलेले असल्याने, या इरादापत्रामुळे संस्थेस कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. त्यामुळे असे इरादापत्र देण्यात आले तरी संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्याशिवाय महाविद्यालय सुरु करता येणार नाही.

२.६ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पुर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल अंतिम मान्यता मिळण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

२.७ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(३)(च) अंतर्गत परंतुकामध्ये नमूद केल्याप्रमाणे खंड (ड.) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत, जर व्यवस्थापन इरादापत्रातील शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर करेल तर, इरादापत्र व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल. परंतु तसेच, अपवादात्मक प्रकरणात आणि कारणे लेखी नमुद करुन राज्य शासन, विद्यापीठाने योग्यरित्या प्रक्रिया केलेल्या व्यवस्थापनाच्या अर्जावर वेळोवेळी, इरादापत्राची वैधता एकूण १२ महिन्यापेक्षा जास्त नसेल, अशा आणखी कालावधीसाठी वाढवू शकेल. मात्र याकरिता विनिर्दिष्ट कालमर्यादा संपण्यापूर्वी संस्थेने पूर्ण समर्थनासह विद्यापीठामार्फत शासनाकडे अर्ज करणे आवश्यक राहील.

३. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पूर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती राहील.

कार्यपद्धती :- (अंतिम मान्यता)

३.१ शासनाकडून नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरिता देण्यात आलेले इरादापत्र निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत वैध असेल. या कालावधीमध्ये ज्या अटी व शर्तींच्या आधारे इरादापत्र देण्यात आलेले आहे, त्या अटी व शर्तींची पूर्तता करुन त्याबाबतच्या अनुपालन अहवालासह नवीन महाविद्यालयास अंतिम मान्यता मागणारा अर्ज संस्थेने आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह ३१ जानेवारीपर्यंत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील.

३.२ नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता मागणाऱ्या इच्छूक संस्थांनी इरादापत्रातील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचा अनुपालन अहवाल संबंधित विद्यापीठाकडे दाखल करावा. त्यासोबत परिशिष्ट "क" मध्ये नमुद केलेली कागदपत्रे जोडण्यात यावीत.

३.३ विद्यापीठांनी ऑनलाईन (Online) पद्धतीने अनुपालन अहवाल तसेच त्यासंदर्भातील सर्व कागदपत्रे स्वीकारावित. ज्या विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने संगणकप्रणाली विकसित करण्यात आलेली नाही, अशा विद्यापीठांनी पुढील एका वर्षात अर्ज स्वीकारण्याची संगणकप्रणाली विकसित करणे अनिवार्य राहील.

३.४ विद्यापीठांकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरिता आवश्यक तेवढ्या छाननी समित्या विद्यापीठांचे कुलगुरु नियुक्त करतील.

३.५ प्राप्त अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट "क" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सूचीनुसार तसेच, या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या निकषांनुसार करुन छाननी समिती त्यांचा अहवाल कुलगुरुंना सादर करतील.

३.६ ज्या संस्थेच्या प्रस्तावात किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्यास त्या संस्थेस / अर्जदारास त्रुटी कळविण्यात येतील.

३.७ त्रुटी कळविण्यात आलेल्या संस्थांनी विद्यापीठाकडे त्रुटीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३.८ त्रुटीच्या पूर्ततेच्या अर्जाची छाननी समितीकडून छाननी करुन त्यासहीत छाननीत पात्र झालेल्या अर्जासह अहवाल अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांना सादर करण्यात येईल.

३.९ संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु विद्यापीठस्तरावर आवश्यक तेवढ्या तज्ज्ञ समिती गठित करतील. सदर तज्ज्ञ समितीमध्ये छाननी समितीच्या सदस्यांच्या अंतर्भाव असणार नाही. सदर तज्ज्ञ समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-"क" मध्ये विहित करण्यात आलेल्या सुचीनुसार तसेच, इरादापत्रामधील अटी व शर्तीनुसार संबंधित संस्थेची तयारी आहे किंवा कसे, याबाबत काटेकोर परिक्षण करुन त्याचा अहवाल व्हिडिओ छायाचित्रणासह अधिष्ठता मंडळामार्फत कुलगुरुंना सादर करेल. विहित केलेले निकष पूर्ण न करणाऱ्या संस्थांची शिफारस विद्यापीठ करणार नाही.

३.१० वरील परि. ३.४ मध्ये विहित केलेली छाननी समिती व परि. ३.९ मध्ये विहित केलेली तज्ज्ञ समिती यांची संख्या ती-ती विद्यापीठे त्या-त्या वर्षी सुरु करावयाच्या नवीन महाविद्यालय (पारंपारिक व व्यावसायिक) यांची व्याप्ती विचारात घेऊन ठरवतील व विहित केलेल्या वेळापत्रकात काम होईल याची खातरजमा करतील.

३.११ कुलगुरुंकडून संबंधित पात्र संस्थांना पात्रता व अपात्रता कळविण्यात येईल.

३.१२ अपात्रता कळविलेल्या संस्था त्याविरुद्ध विद्यापीठाकडे अपिल दाखल करु शकतील. सदर अपिलावर (गरजेनुसार तज्ज्ञ समिती पाठवून अहवाल घेऊन) कुलगुरु निर्णय देतील.

३.१३ सर्व पात्र अर्जदार संस्थांचे अर्ज व त्यासोबतचा अनुपालन अहवाल मंजुरीच्या शिफारशीसह परिशिष्ट "क" व प्रपत्र "ब" व त्यासोबतच्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाकडून शासनाकडे मे च्या पहिल्या दिवशी किंवा त्याआधी सादर करण्यात येतील.

३.१४ विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासनाकडून १५ जूनपर्यंत परवानगी कळविण्यात येईल.

४ सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून ज्या संस्थेस नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देण्यात आलेले आहे व त्यांनी इरादापत्राच्या अटी व शर्ती पुर्ण केलेल्या आहेत, त्याप्रकरणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देण्याकरिता पुढील प्रमाणे निकष राहतील.

**निकष :- (अंतिम मान्यता)**

४.१ नवीन महाविद्यालय सुरु करण्याकरीता इरादापत्र दिलेल्या ज्या महाविद्यालयांनी इरादापत्रामधील अटी व शर्तींची तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता करुन अनुपालन अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे, अशा प्रस्तावांची शिफारस विद्यापीठाने शासनाकडे करावी.

४.२ विद्यापीठांनी अनुपालन अहवाल स्वीकारताना व शिफारस करताना या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी व सोबत जोडलेल्या परिशिष्ट "क" मधील निकषांची पूर्तता होत असल्याची खातरजमा करुन त्यापुष्ट्यर्थ कागदपत्रे अनुपालन अहवालासोबत क्रमवार पद्धतीने जोडण्यात यावीत.

५. परिशिष्ट "क" मधील अनुक्रमांक ७ (अ) व ७ (ब) साठी परिशिष्ट "ड" मध्ये दर्शविण्यात आलेले कक्षनिहाय आवश्यक क्षेत्रफळ विचारात घेण्यात यावे. यानुसार सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध असणे तसेच, मागणी करण्यात आलेल्या विद्याशाखानिहाय यासाठी विहित केलेल्या निकषांनुसार बांधकाम पूर्ण असणे आवश्यक राहील.

६. शासनाने विहित केलेल्या निकषांची पूर्तता न करणारे प्रस्ताव विद्यापीठांनी शिफारशीत करु नयेत. विद्यापीठांनी सकारात्मक शिफारस करुनही अंतिम मान्यता प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव अनेक

न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. त्यामुळे निकषांची व सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारेच प्रस्ताव शिफारशीत होतील, याची दक्षता विद्यापीठाने घ्यावी. अशी पूर्तता न करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याची जबाबदारी विद्यापीठाची पर्यायाने प्र.कुलगुरु तथा अध्यक्ष, अधिष्ठता मंडळ यांची राहील.

७. नवीन महाविद्यालय सुरु करण्यास देण्यात येणारी मान्यता ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

८. ज्या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे आवश्यक आहे. संलग्निकरण किंवा इतर शिखर संस्था / केंद्रीय नियामक मंडळे यांची परवानगी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जर महाविद्यालये त्या शैक्षणिक वर्षात सुरु होऊ शकले नाही तर, त्या शैक्षणिक वर्षाच्या पुढील शैक्षणिक वर्षात महाविद्यालय सुरु करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१५१३३५३६५२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e9691892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.09.15 15:54:50 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) सर्व मा.संसद सदस्य/मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
९) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
१०) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
११) सह सचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
१३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१४) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
१५) निवड नस्ती (मशि-४).

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

## * परिशिष्ट-अ *

### नवीन महाविद्यालयांकरिता इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने करावयाचा अर्ज

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह) | | | | |
| २. | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता : | | | | |
| ३. | ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या : | | | | |
| ४. | नवीन महाविद्यालयासाठी इरादापत्र मागण्यात येत असलेले सत्र : | | | | |
| ५. | अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील (मूळ तुकडी अनुदानावर असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करावा) : **तुकड्यांचा प्रकार नमूद करण्यात यावा. (अनुदानित/विना अनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित)** | | ✓ | विषय | विद्यार्थी संख्या |
| | | विद्याशाखा | | | |
| | | अभ्यासक्रम | | | |
| | | विषय | | | |
| | | तुकडी | | | |
| ६. | आवेदन शुल्क रुपये-----/-, धनाकर्ष क्र.----------------<br>दिनांक ------------------ बँकेचे नाव---------------------<br>(धनाकर्ष कुलसचिव,-------------------------विद्यापीठ यांचे नावे असावा.) | | | | |
| ७. | महाविद्यालय सुरु करावयाच्या अभ्यासक्रमाचा तपशील: | | | | |

| अ.क्र. | शाखा | अभ्यासक्रम | अध्यापनाचे माध्यम | अध्यापनाचे विषय |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

| | |
|---|---|
| ८. | संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक -------- व दिनांक ----------- |
| ९. | संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास, त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक -------- |
| १०. | प्रस्तावित महाविद्यालय सुरु करणार असलेले विद्याशाखा, अभ्यासक्रम व विषय हे प्रस्तावित महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास, त्या महाविद्यालयांच्या नावासह तपशील :<br>(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळ्या कागदावर तपशील देण्यात यावा.) |
| ११. | निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या : |

| कला | वाणिज्य | विज्ञान | विधि | इतर |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | |
|---|---|
| १२. | १५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी : |

| अ. क्र. | शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता | वर्ष | उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |

| | |
|---|---|
| १३. | कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परीक्षेचे केंद्र आहे काय ? ------------------------------ |

| | |
|---|---|
| १४. | केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या ---------------------------------------------------- |
| १५. | अ) संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशील------------------------<br>ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परीक्षेस बसलेले विद्यार्थी --------------------- |
| १६. | अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार --------------<br>ब) सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? --- ----------- ------- असल्यास, त्याचा तपशील ------------------------- |
| १७. | अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>(अ) स्थावर मालमत्ता<br>(ब) जंगम मालमत्ता<br>(क) बँकेतील रोख<br>(ड) बँकेचे वा इतर कर्ज |
| १८. | वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीचा तपशील : ------------------------------------------------- |

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**अध्यक्ष**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

**मूळ सही (शिक्क्याची नाही)**
**सचिव**
**(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)**

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

* परिशिष्ट-ब *

संस्थेचे नाव :- विद्यापीठाचे नाव :

ठिकाण :- विद्याशाखा :-

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची | पुर्ततेचा तपशील (होय/नाही) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणारा संस्थेचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या अंकेक्षित आर्थिक लेखे-जोखे व लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती. या आधारे नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या विकास योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या आर्थिक स्रोतांबाबत स्वयंस्पष्ट माहिती. | | |
| ६. | संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत / शेड्युल बँकेमार्फत केले जात असल्याचे कागदपत्र. | | |
| ७. | पुढीलप्रमाणे किमान ५ वर्षे, किमान मुदत ठेवची (Fix Deposit) प्रमाणित प्रत.<br>अ) विधी महाविद्यालय : रु. १५.०० लाख<br>ब) पारंपारीक महाविद्यालय : रु. ७.०० लाख<br>(उदा. कला, विज्ञान, वाणिज्य इ.) | | |
| ८. | संबंधित राष्ट्रीयकृत शेड्युल बँकेत ठेवलेला मुदत ठेव निधी विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय न काढण्याबाबतचे संबंधित राष्ट्रीयकृत बँकेचे व संस्थेचे संयुक्त आश्वासन पत्र. | | |
| ९. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, मंजुर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी देण्यात येणारे इरादापत्र हे कायम विनाअनुदान तत्वावरील महाविद्यालयासाठी मान्य असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १०. | संस्थेचे सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालय अस्तित्वात असेल तर अस्तित्वात असलेल्या इमारतीच्या बांधकामाचा वापर वरीष्ठ महाविद्यालयासाठी केला जाणार नाही, असे हमीपत्र तसेच, कनिष्ठ महाविद्यालयाच्या बांधकामाचा प्रमाणित नकाशा सादर करावा. | | |
| ११. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>अ) मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>ब) अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये मूल्यांकन/ पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र असल्यास नॅक/ एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. | | |
| १३. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेने बृहत आराखड्यामध्ये निश्चित केलेले बिंदुच्या ठिकाणी जागा उपलब्ध असल्यासंदर्भातील कागदपत्रे.<br>१) <u>स्वत:ची जागा</u> -<br>अ) "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>ब) "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>क) "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>ड) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावावर असलेल्या सरकारी कागदपत्रांची प्रमाणित प्रत.<br>२) <u>भाड्याची जागा</u> - **(किमान ०५ वर्षासाठी भाडेकरारनामा)**<br>अ) "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये १/२ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>ब) "अ", "ब" आणि "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रापासून ५ कि.मी. परिसरात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>क) "ड" वर्ग महापालिका व नगरपालिका क्षेत्रात किमान १ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत.<br>ड) उर्वरित सर्व क्षेत्रांसाठी किमान ३ एकर जागा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर घेतलेल्या नोंदणीकृत कराराची प्रत. | | |
| १४. | प्रस्तावित महाविद्यालयांसाठी इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञाकडून तयार करुन घेतलेला नकाशा. | | |
| १५. | प्रस्तावित महाविद्यालयाकरिता भौतिक साधने निर्माण करण्यासाठी भांडवली खर्चाचा टप्पानिहाय विनियोग आणि त्याचे वित्तीय स्रोत. तसेच, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नेमणुकीसंदर्भातील तसेच त्याकरिताच्या वित्तीय तरतुदीचे नियोजन | | |
| १६. | संस्थेचा शिक्षण क्षेत्रातील पूर्वानुभव, संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान, विविध शैक्षणिक प्रकल्पांबाबतची माहिती आणि काही ठळक विशेष संपादणूक असल्यास, त्याबाबतची सविस्तर माहिती. | | |
| १७. | प्रस्तावित महाविद्यालयाबाबतचा किमान पाच वर्ष कालावधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल. | | |
| १८. | इरादापत्र ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येणार आहे त्या अटी व शर्तीची पूर्तता निकटतम पुढील वर्षाच्या ३१ जानेवारीपर्यंत करण्यात येईल, असे संस्थेचे हमीपत्र. | | |

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

* परिशिष्ट-क *

संस्थेचे नाव :- विद्यापीठाचे नाव :

ठिकाण :- विद्याशाखा :-

| अ.क्र. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी अंतिम मान्यता देताना विचारात घ्यावयाची तपासणी सूची | पुर्ततेचा तपशील (होय/नाही) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी शासनाने दिलेले इरादापत्र. | | |
| २. | नवीन महाविद्यालयाच्या अंतिम मान्यता मिळण्यासाठी संबंधित संस्थेने सादर केलेला अनुपालन अहवाल. | | |
| ३. | इरादापत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाली असल्याचे संस्थेने दिलेले व विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. | | |
| ४. | चालू वर्षाच्या तपशीलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ५. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाची प्रत. | | |
| ६. | इरादापत्र देण्याकरिता जे जमिनीचे (स्वतःची किंवा भाडेतत्वावर) निकष विहित केलेले आहेत, ती जमिन अकृषक (संस्थेच्या नावावर किंवा संस्थेच्या नावे भाडेतत्वावर असलेल्या) असल्यासंदर्भातील कागदपत्रे. | | |
| ७. | अ) इमारत (स्वत:ची) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर प्राधिकरणाचे प्रमाणित उतारे<br>ब) इमारत (भाड्याची) (नोंदणीकृत भाडेकरार)<br>(सोबतच्या परिशिष्ट-"ड" मध्ये सर्वसाधारण वर्ग खोली व इतर क्षेत्रफळाचा तपशील सोबत जोडला आहे.)<br>**१) शैक्षणिक व प्रशासकीय इमारत**<br>१.१) प्राचार्य कक्ष<br>१.२) कार्यालय<br>१.३) इलेक्ट्रॉनिक्स / संगणक प्रयोगशाळा<br>१.४) रसायनशास्त्र प्रयोगशाळा<br>१.५) पदार्थ विज्ञान प्रयोगशाळा<br>१.६) जीवशास्त्र प्रयोगशाळा<br>१.७) ग्रंथालय<br>१.८) लेडीज रुम<br>१.९) रेकॉर्ड रुम<br>१.१०) नॅक रुम<br>१.११) स्टाफ रुम<br>१.१२) सभागृह<br>१.१३) मोठे व्याख्यान कक्ष<br>१.१४) टॉयलेट ब्लॉक<br>१.१५) व्हरांडा<br>१.१६) एन.सी.सी. रुम<br>१.१७) एन.एस.एस. रुम | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | २) २.१) पाणी सुविधा (पाणी पट्टी पावती)<br>२.२) वीज सुविधा (वीज देयकाची प्रत)<br>२.३) ड्रेनेज सुविधा (स्थानिक प्राधिकरणाचे नकाशासह प्रमाणपत्र)<br>३) हॉस्टेल सुविधा (परिसरात २०% विद्यार्थ्यांची रहाण्याची सोय असल्याचे प्रमाणपत्र) | | |
| ८. | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीत सेमिनार रुम, लेक्चरर रुम, फॅक्टरी रुम, स्टाफ रुम, प्राचार्यांची रुम, कॉमन रुम, हॉस्टेल रुम इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर. | | |
| ९ | ७ (अ) व (ब) मधील १ व २ साठी फर्निचर (खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| १० | ग्रंथालयात पुस्तकांची सुविधा (मागणी केलेल्या विद्याशाखेशी संबंधित किमान ५०० पुस्तके खरेदी केल्याची अधिकृत पावती) उपलब्धतेबाबत विद्यापीठाचे प्रमाणपत्र. | | |
| ११ | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित आवश्यक सामग्री (किमान रु.१.०० लाख प्रत्येक विषयासाठी राखीव) | | |
| १२ | प्रस्तावित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना खेळण्याची सोय, कॅन्टीन, हेल्थ केअर सुविधा. | | |
| १३ | संबंधित संस्था प्रस्तावित महाविद्यालयाकरिता क्रीडांगण भाड्याने वापरणार असल्यास रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत भाडेकराराची साक्षांकित प्रत. | | |
| १४ | प्रथमत: महाविद्यालय भाडेतत्वावरील इमारतीत सुरु केले जाणार असेल तर प्रथम संलग्निकरण मिळाल्यापासून ५ वर्षामध्ये महाविद्यालय ज्या ठिकाणासाठी मंजूर झाले आहे, त्याठिकाणी स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणार असल्याबाबतचे हमीपत्र. | | |
| १५ | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत मंजूर करण्यात येणाऱ्या नवीन महाविद्यालयासाठी नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| १६ | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार<br>अ) मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत<br>ब) अर्हताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध आहेत<br>याबाबत संस्थेचे संबंधित अकृषि विद्यापीठाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र | | |
| १७ | प्रस्तावित महाविद्यालयामध्ये अर्हताधारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीसंदर्भात संस्थेने केलेल्या कार्यवाहीची माहिती | | |
| १८ | नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मागणाऱ्या संस्थेच्या सद्य:स्थितीत अस्तित्वात असणारी महाविद्यालये इरादापत्राच्या कालावधीत मूल्यांकन/पूनर्मूल्यांकनाकरिता पात्र ठरली असल्यास नॅक / एनबीए मानांकन व मूल्यांकन, पूनर्मूल्यांकन करुन घेण्यासंदर्भात कार्यवाही सुरु केली असल्याचे प्रमाणपत्र. | | |

शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दि.१५ सप्टेंबर, २०१७

परिशिष्ट -"ड"

परिशिष्ट "क" मधील अ.क्र. ७ (अ) व (ब) साठी कक्षनिहाय किमान आवश्यक क्षेत्रफळ

| अ. क्र. | कक्षाचे नाव | नग | क्षेत्र प्रति नग | एकुण क्षेत्र | कला/विधी/ शिक्षण शाखा | वाणिज्य | विज्ञान | कला + वाणिज्य | कला + विज्ञान | वाणिज्य + विज्ञान | कला,वाणिज्य, विज्ञान |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्राचार्य कक्ष | १ | २०X२५ | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| २) | कार्यालय | १ | ३०X२० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० | ६०० |
| ३) | इलेक्ट्रॉनिक/संगणक प्रयोगशाळा | १ | २०X३० | ६०० | -- | -- | ६००(०) | -- | ६००(०) | ६००(०) | ६००(०) |
